THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH JUNE 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ८ माहे मार्च सन १८९४ रोजीं मंजूर केला तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला आहे :—**

### सन १८९४ चा आक्ट नंबर ६.

**समुद्राचे व आगीचे विम्याच्या पालिसी आणि विक्रीचीं सर्टिफिकेटें ह्यांच्या संबंधानें सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ह्याची सुधारणा करण्याबाबद आक्ट.**

समुद्राचे व आगीचे विम्याच्या पालिसी आणि विकरीचीं सर्टिफिकेटें ह्यांच्या संबंधानें सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारणें ज्या अर्थीं इष्ट आहे, त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

**समुद्राचे व आगीचे विम्याच्या पालिसी.**

कलम ३, रकम १५, ह्यांतल्या "विम्याची पालिसी" ह्या संज्ञेच्या व्याख्येंत, समुद्राच्या विम्याच्या संबंधानें जास्त मजकूर दाखल करणें.

१. सन १८८८ चा आक्ट १ ला, कलमं १, ह्याअन्वयें सुधारलेला सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट, कलम ३, रकम (१९), हींत खालील मजकूर जास्त दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"ह्या संज्ञेंत समुद्राच्या विम्याच्या पालिसीचाही समावेश होतो; अशा पालिसीचा अर्थ, (अ) कोणत्याही तारवावर अगर जहाजावर अथवा कोणत्याही तारवाच्या अगर जहाजाच्या यंत्रांवर अगर डोलकाठ्या, शिडें, इत्यादि सरंजामावर अगर कोणत्याही तारवांतल्या किंवा जहाजांतल्या कोणत्याही प्रकारच्या मालावर, व्यापारी जिन्नसांवर अगर मिळकतीवर अगर कोणत्याही तारवाच्या किंवा जहाजाच्या नोरावर अगर कोणत्याही

तारवांतल्या अगर जहाजांतल्या अगर त्यासंबंधाच्या ज्या कोणत्याही इतर हितसंबंधावर कायदेशीर रीतीनें विमा उतरतां येईल त्या हितसंबंधावर उतरलेला विमा, असा होतो ; आणि अशा पालिसींत (ब) मालाच्या, व्यापारी जिन्नसांच्या अगर मिळकतीच्या कोणत्याही खेपेबद्दल उतरलेल्या विम्याचा समावेश होऊन त्या विम्यांत केवळ समुद्राच्या धोक्याबद्दलच नव्हे परंतु अशा खेपेच्या सुरुवातीपासून विम्याच्या पालिसींत लिहिलेल्या शेवटच्या जागेस पोंहचण्यापर्यंतच्या अशा खेपेसंबंधाच्या इतर कोणत्याही धोक्याचा समावेश होतो ;

आणि जेव्हां कोणताही मनुष्य, जास्त नोंदादाखल अगर इतर रीतीनें दिलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही रकमेच्या मोबदला, कोणत्याही तारवावर अगर जहाजावर असलेल्या कोणत्याही प्रकारच्या मालाची, व्यापारी जिन्नसांची अगर मिळकतीची जोखीम, तो माल, ते जिन्नस अगर ती मिळकत त्या तारवावर अगर जहाजावर असे तोंपर्यंत आपल्या शिरावर घेण्याचा करार करील, अगर अशा कोणत्याही मालाच्या, व्यापारी जिन्नसांच्या अगर मिळकतीच्या मालकास जी कोणतीही जोखीम, तोटा किंवा नुकसान होईल तें भरून देण्यास कबूल करील, तेव्हां असा करार किंवा कबुलायत समुद्राच्या विम्याचा करार आहे असें समजलें पाहिजे."

७ व्या व ८ व्या कलमांच्या दरम्यान, समुद्राचे विम्याच्या संबंधानें नवीन कलम दाखल करणें.

२. सदहू आक्टाच्या ७ व्या व ८ व्या कलमांच्या दरम्यान खालील कलम दाखल करावें : तें कलम येणेंप्रमाणें :—

समुद्राचे विम्याच्या पालिसी.

"७ अ. (१) सन १८६२ चा व्यापारी लोकांच्या तारवांबाबद आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट ह्याच्या ९१ व्या कलमांत उल्लेख केलेल्या विम्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही समुद्राचे विम्याबाबदचा करार, समुद्राचे विम्याच्या पालिसींत लिहिलेला नसल्यास कायदेशीर होणार नाहीं.

"(२) मुदतीकरितां केलेली कोणतीही समुद्राचे विम्याची पालिसी बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीकरितां करूं नये.

"(३) समुद्राचे विम्याची पालिसी ज्या विवक्षित धोक्याबद्दल, साहसाबद्दल अगर मुदतीबद्दल केली असेल, तो धोका, तें साहस अगर ती मुदत, आणि वर्गणीदारांचीं अगर अंडर-रैटरांचीं नांवें आणि विम्याची रकम अगर रकमा इतक्या गोष्टी त्या पालिसींत निर्दिष्ट केलेल्या असल्यावांचून, ती कायदेशीर होणार नाहीं.

"(४) जेव्हां कोणताही समुद्राचा विमा कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेला असून मुदतीबद्दलही केलेला असेल, अगर सफरीच्या मुदतीसुद्धां आणखी, तारूं नेमलेल्या ठिकाणीं पोंचून तेथें तें नांगरल्यानंतरच्या तीस दिवसांपलीकडील कोणत्याही मुदतीस लागू असणारा किंवा ज्यांत अशा कोणत्याही मुदतीचा समावेश होतो असा केलेला असेल, तेव्हां, त्या पालिसीवर सफरीबद्दलच्या अगर सफरीवरच्या पालिसीप्रमाणें ड्यूटी पडून, शिवाय, मुदतीबद्दलच्या पालिसीप्रमाणेंही ड्यूटी पडेल."

परिशिष्ट १, याची समुद्राच्या विम्यासंबंधानें सुधारणा.

३. सन १८८८ चा आक्ट १ ला, कलम २, ह्यावरून सुधारलेलें सदहू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टाचें अर्टिकल ४९ ह्याच्या समुद्राच्या विम्यासंबंधाच्या (अ) ह्या रकमेच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा :—

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्युटी. |
|---|---|
| (अ) (१) कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेल्या समुद्राच्या विम्याच्या बाबतींत,— | |

| | दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्युटी. |
|---|---|---|
| ४९. विम्याची पालिसी. | (१) सलामतीची अगर मोबदल्याची रक्कम पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेवर दर शेंकडा दोन आणे ह्मणजे एक अष्टमांश टक्का ह्यापेक्षां जास्त नसेल तेव्हां ... ... ... | ० १ ० |
| | (२) इतर कोणत्याही बाबतींत, पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दलही ... ... ... | ० २ ० |
| | (२) मुदतीबद्दल केलेल्या समुद्राच्या विम्याच्या बाबतींत— | |
| | (३) पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दलही ड्युटी पडेलः— | |
| | विमा साहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा नसेल तेव्हां ... ... ... | ० २ ० |
| | विमा साहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा असून बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा नसेल तेव्हां ... ... | ० ४ ० |

परिशिष्ट १, आंटिकल ४९, ह्यांत समुद्राच्या व आगीच्या विम्यासंबंधानें सुधारणा व ज्यास्त मजकुर दाखल करणें.

४. (१) सन १८८८ चा आक्ट १, कलम २, ह्यावरून सुधारलेली, सदर्हू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टाच्या ४९ व्या आर्टिकलची रकम (क) हींत, "इतर कोणत्याही विम्याच्या बाबतींत" ह्या शब्दांच्या आधीं, "ह्या आर्टिकलाच्या (ड) रकमेंत सांगितलेल्या पुनः केलेल्या विम्याशिवाय" हे शब्द दाखल करावे.

(२) वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेल्या सदर्हू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांतील ४९ व्या आर्टिकलाच्या (क) रकमेनंतर खालील मजकुर दाखल करावाः तो मजकूर येणेंप्रमाणें :—

| | दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्युटी. |
|---|---|---|
| ४९. विम्याची पालिसी (पुढें चालू). | (ड) समुद्राच्या विम्याची पालिसी अगर आगीनें होणाऱ्या नुकसानीबद्दल विम्याची पालिसी ज्या कोणत्याही विम्याच्या कंपनीनें दिलेली असेल अशी कोणतीही विम्याची कंपनी असल पालिसीवरून उतरलेल्या विम्याच्या रकमेचा विवक्षित भाग भरून देण्याच्या हमीदाखल अगर जिम्मेदाखल दुसऱ्या कोणत्याहि कंपनीबरोबर पुनः विमा उतरील त्या बाबतींत. | १ ० ० |

## विकरीचीं सर्टिफिकट.

कलम २४ हें विकरीच्या सर्टिफिकेटांस लागू नाहीं.

३. सदर्हू आक्टाचें कलम २४ हें त्याच आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांतल्या १६ व्या आर्टिकलांत सांगितलेल्या कोणत्याही विकरीच्या सर्टिफिकेटास लागू नाहीं व कधींही लागू नव्हतें असें समजावें.

मात्र इतकेंच कीं, ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या आधीं कोणत्याही कोर्टानें अगर रेव्हेन्यू आफिसरानें दिलेल्या कोणत्याही हुकुमनाम्यास अगर हुकुमास ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

परिशिष्ट १ लें, ह्याची विकरीच्या सर्टिफिकेटांच्या संबंधानें सुधारणा.

४. सदर्हू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांत १६ व्या आर्टिकलाच्या तिसऱ्या आसनांत "खरेदीचे पैक्याचें रकमे इतके" ह्या शब्दांनंतर "मात्र" हा शब्द दाखल करावा.

(सही) एस्. हार्वे जेम्स,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.